वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेंतर्गत सन २०१८-१९ मध्ये प्रशासकीय मान्यता दिलेल्या गोंदिया जिल्ह्यातील कामांकरीता आवश्यक निधी सन २०१९-२० या वित्तीय वर्षात उपलब्ध तरतुदीमधून वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागाव वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,
शासन निर्णय क्रमांकः तांसुयो-२०१९/प्र.क्र.२७१/विजाभज-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक: ०८ जुलै, २०१९.

वाचा - १) शासन निर्णय सामाजिक न्याय,सांस्कृतीक कार्य व क्रिडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्रमांकः- इमाव-२००३/ प्र.क्र. २०५/ मावक-३, दि. ०७ जून, २००३.
२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागाव वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग क्रमांक तांसुयो-२०१७/प्र.क्र.८४/विजाभज-१, दि.३० जानेवारी, २०१८.
३) शासन निर्णय समक्रमांक दि.८ मार्च, २०१९.

प्रस्तावना -

वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेंतर्गत सन २०१८-१९ मध्ये गोंदिया जिल्ह्यातील रु.४५.०० लक्ष (रुपये पंचेचाळीस लक्ष फक्त) इतक्या रकमेच्या १२ कामांना संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु सदर कामांना सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात उपलब्ध तरतूदीमधून निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. त्यामुळे संदर्भ क्र.३ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेल्या रु.४५.०० लक्ष (रुपये पंचेचाळीस लक्ष फक्त) इतक्या रकमेच्या १२ कामांना निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयांन्वये वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेंतर्गत सन २०१८-१९ मध्ये प्रशासकीय मान्यता दिलेल्या गोंदिया जिल्ह्यातील कामांकरीता आवश्यक रु.४५.०० लक्ष (रुपये पंचेचाळीस लक्ष फक्त) इतका निधी सन २०१९-२० या वित्तीय वर्षातील उपलब्ध तरतूदीमधून वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च सन २०१९-२० या वित्तीय वर्षात "मागणी क्र.झेडजी-३, २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ८०-सर्वसाधारण, १०२-स्वयंसेवी संस्थांना मदत, (०२) तांडा वस्ती सुधार योजना,(०२)(०१) विजाभज आणि विमाप्र यांच्यासाठी तांडा वस्ती सुधार योजना (कार्यक्रम), ३१-सहाय्यक अनुदान (वेतनेतर) (कार्यक्रम) (दत्तमत) (२२२५ एफ ०५८)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो या योजनेंतर्गत प्राप्त अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदरचा निधी वितरीत करण्यासाठी सहसचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून तसेच सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, गोंदिया यांना "आहरण व संवितर अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. आहरण व संवितर अधिकारी यांनी कामाबाबतचा अहवाल वेळोवेळी शासनास सादर करावा व याबाबत महालेखापाल कार्यालयाशी ताळमेळ करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

४. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०७०८१७३०२२५०२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.07.09 12:34:24 +05'30'

(भा.र.गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. महालेखापाल महाराष्ट्र -१/२ (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखा परीक्षा), मुंबई / गोंदिया
२. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेची जिल्हास्तरीय समिती , गोंदिया
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया
४. संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, पुणे
५. प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण, नागपूर.
६. सहायक आयुक्त, समाज कल्याण, गोंदिया.
७. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गोंदिया.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया.
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१०. लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई
११. सह सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. उप सचिव (का-१४११) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. उप सचिव (व्यय-१५) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. सर्व सहसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प/रोखशाखा), विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. प्रधान सचिव, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक , मंत्रालय, मुंबई
१७. निवड नस्ती, विजाभज-२.